# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी § 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.
E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ

क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/ १२५८
दिनांक : 20 SEP 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास विहीत मुदतीत अपलोड न केलेले प्रवेश तसेच मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेशाबाबत....

संदर्भ : संचालनालयाच्या सूचना क्रमांक ---- .
१)२A/ADM/२०१६/१११७,दिनांक १३.८.२०१६
२) २A/ADM/२०१६/१२०७,दिनांक५.९.२०१६
३) १०/एडीएम/पदविका/२०१६/१०८३ दिनांक १८.८.२०१६

शासनाने महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५,दिनांक१७.८.२०१५लागू केला त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित तदनुषंगिक बाबींसाठी " प्रवेश नियामक प्राधिकरण " आणि " शुल्क नियामक प्राधिकरण " या दोन प्राधिकरणांची स्थापना केली आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष निर्माण केलेला आहे. या अधिनियमानुसार तंत्रशिक्षणातील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश नियम व प्रवेश पात्रता शासनाने राजपत्राद्वारे दिनांक ११.३.२०१६ रोजी प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेशनियम अंमलात आले व प्रवेश प्रक्रिया संपन्न झालेल्या आहेत.

प्रवेश करण्यासाठी कट ऑफ डेट तसेच सदर प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी प्रथम वर्ष पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांकरिता संदर्भाधीन क्रमांक १ च्या सूचनेअन्वये , थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी संदर्भाधीन क्रमांक २ च्या सूचनेअन्वये आणि पदविका अभ्यासक्रमासाठी संदर्भाधीन क्रमांक ३ च्या सूचनेअन्वये कळविण्यात आलेले आहे.

गत शैक्षणिक वर्षापर्यंत व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या खाजगी विनाअनुदानीत संस्थांमध्ये विहीत मुदतीत प्रवेश अपलोड न केलेल्या / उशिराने प्रवेश केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत दंडात्मक कारवाई करून प्रवेश नियमित करण्यात येत होते. तथापि शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ , दिनांक १७.८.२०१५ अस्तित्वात आला असून त्यामध्ये उशिरा प्रवेश /प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे,मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही.

वरील बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर प्रवेश केलेले/ उशिरा अपलोड केलेले तसेच मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश केलेल्या उमेदवारांचे प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करता येणार नाहीत. असे प्रवेश रद्दबातल ठरविण्यात येतील. सदर वस्तुस्थिती आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या खाजगी विनाअनुदानीत संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी. तसेच ज्या संस्थांनी अशा प्रकारे उशिरा प्रवेश करणे / उशिरा अपलोड करणे, जास्तीचे प्रवेश केले असतील अशा संस्थांना सदर उमेदवारांचे प्रवेश तात्काल रद्द करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द न केल्यास व गुणवत्ता यादी पडताळणी अंती सदर प्रवेश रद्द झाल्यास विद्यार्थ्यांचे होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थेचे प्राचार्य व्यक्तीश: जबाबदार असतील याची जाणीव त्यांना करून देण्यात यावी. तसेच अशा प्रकरणी उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणाची सर्व जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुखांची वैयक्तिक राहील ही बाबही सर्व खाजगी विनाअनुदानीत संस्थांच्या प्राचार्यांच्या निदर्शनास आणण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीसाठी सविनय सादर -
१.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई ३२
२.मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई ४०००५१

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2016/ 2707
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 26 SEP 2016

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रम,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश विहीत मुदतीत अपलोड न केल्यास तसेच मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केल्यास तो तात्काळ रद्द करण्याबाबतची कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर